महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४ था मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
Website - www.msbsd.edu.in Email - secretary@msbsde.edu.in दुरध्वनी क्र. ०२२-२६४७४४३५

**परिपत्रक**

परिपत्रक क्र.: का.क्र. ०१/मान्यता/२०२२/८३०
दिनांक: २०.०५.२०२२

विषय: सन २०२२-२३ या प्रशिक्षण सत्रापासुन संलग्नता नूतनीकरण मान्यताबाबत...

संदर्भ:

१. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, दि. २०.०१.२०२२, महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ - महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१
२. मंडळाचे परिपत्रक क्र. का.क्र.०१/मान्यता/२०२१-२२/१५१, दि.३१.०१.२०२२
३. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी-२०२०/प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.१६.०२.२०२२

१. संदर्भीय अधिनियम क्र. ०१ अन्वये राष्ट्रीय कौशल्य अर्हता आराखडा यानुसार कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि उद्योजकता शिक्षण व महाराष्ट्र राज्यातील इतर कौशल्य पाठ्यक्रम यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींचे नियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक इतर बाबींसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ स्थापन करण्यासाठी व विधीसंस्थापित करण्यासाठी अधिनियम, २०२१ निर्गमित करण्यात आला आहे.

२. उपरोक्त अधिनियमातील प्रकरण चार मध्ये “परवानगी, संलग्नता, स्वायत्त दर्जा प्रदान करणे व समतुल्यता” याबाबत सविस्तार तरतूदी देण्यात आल्या आहेत.

३. अधिनियमातील कलम ३१ अन्वये “संलग्न परिसंस्थेस, ज्याच्यासाठी संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आली होती त्या अभ्यास पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण पुढे चालू ठेवण्यासाठी, अशा संलग्नीकरणाच्या समाप्तीच्या तारखेपूर्वी साधारणपणे सहा महिने अगोदर अर्ज करता येईल. मंडळ, कलमे २८, २९ व ३० यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीचे, ती जेथवर संलग्नीकरण मंजूर करण्यासाठी लागू असेल तेथवर, पालन करील” अशी तरतूद समाविष्ट आहे.

४. शासनाव्दारे/ मंडळाव्दारे मान्यता प्रदान करण्यात आलेल्या संस्थांनी मंडळाकडे सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) जमा केल्यानंतर संस्थांना प्रथम एक वर्षाकरीता संलग्नता देण्यात येत असते. पुढील वर्षासाठी संलग्नता नूतनीकरणासाठी संस्था संबंधीत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करतात. संलग्नता नूतनीकरणासाठी अर्ज प्राप्त झालेल्या संस्थांचे अर्ज संबंधीत जिल्हा

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याव्दारे तपासण्यात येतात व प्रत्यक्ष निरिक्षण करुन संबंधीत संस्था निर्धारित मानकांची पूर्तता करीत असल्याची खात्री करुन प्रादेशिक कार्यालयामार्फत मंडळाकडे शिफारस सादर करतात.

५. मंडळाकडे प्राप्त झालेल्या शिफारस प्रस्तावांची छाननी करुन मंडळाव्दारे संस्थांना एक वर्षासाठी संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्यात येते.

६. संस्थांना एक वर्ष कालावधीसाठी संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्यात येत असल्याने संस्था, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, प्रादेशिक कार्यालय व मंडळ स्तरावर संलग्नता नुतनीकरणाची कार्यवाही जवळपास वर्षभर राबविण्यात येत असते.

७. सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी निरंतरपणे याच प्रकारची कार्यवाही करण्यात व्यस्त असल्याने संस्थांच्या प्रशिक्षण दृष्ट्या आवश्यक असणाऱ्या बाबीं कडे काहीप्रमाणात दुर्लक्ष होत आहे.

८. विद्यापीठ, उच्च व तंत्रशिक्षण अंतर्गत संस्था, सेक्टर स्किल कॉन्सिल अंतर्गत प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद अंतर्गत संस्था, इत्यादी तसेच राज्यातिल इतर विद्यालय, महाविद्यालय व प्रशिक्षण संस्थांना किमान तीन वर्षासाठी संलग्नता नूतनीकरण देण्याची कार्यपद्धती अवलंबिण्यात येते.

९. संदर्भीय शासन निर्णय क्र. ०३ अन्वये मंडळात महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद या संस्थेचे विलीनीकरण करण्यात आले आहे. सबब, आता परिषदे अंतर्गत मान्यता दिलेल्या जवळपास ५००० पेक्षा अधिक संस्था मंडळांतर्गत मान्यताप्राप्त संस्था म्हणून संबोधल्या जातील (Deemed to be Affiliated).

१०. उपरोक्त नमूद संदर्भ व वस्तुस्थिती यांचे अवलोकन केले असता मंडळांतर्गत मान्यताप्राप्त संस्थांना दरवर्षी संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्याऐवजी तीन वर्ष कालावधीसाठी संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

११. मान्यताप्राप्त संस्थांना तीन वर्ष कालावधीसाठी संलग्नता नूतनीकरण प्रदान करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यपद्धती निर्धारित करण्यात येत आहे

११.१. मान्यताप्राप्त संस्थांनी मंडळाच्या संकेतस्थळावर दिलेल्या नमुन्यात दि.०१.०७.२०२२ ते दि.३०.०६.२०२५ या तीन प्रशिक्षण वर्षाच्या कालावधीसाठी संलग्नता नूतनीकरणासाठी संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे दि.१०.०६.२०२२ पर्यंत खालील आवश्यक दस्तऐवजांसह अर्ज सादर करावा.

११.१.१. संस्थेत सर्व अभ्यासक्रमांत मागील तीन प्रशिक्षण वर्षात प्रत्यक्ष प्रवेश, परीक्षेस बसलेले प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी यांची सांख्यिकी माहिती.

११.१.२. जागतिक स्तरावरील कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षण वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये प्रत्यक्ष प्रवेश कमी झाले आहेत. सबब, प्रवेश, परीक्षेला बसलेले व उत्तीर्ण

प्रशिक्षणार्थ्यांची संख्या हे निकष २०२२ मध्ये संलग्नता नूतनीकरण देतांना शिथिल करण्यात येत आहेत.

११.१.३. संलग्नित अभ्यासक्रमांसाठी आवश्यक प्रशिक्षण सुविधा जसे की, यंत्रसामुग्री व उपकरणे (Machines and Equipments), हत्यारे (Hand Tools) व आवश्यक इतर साधनसामुग्री.

११.१.४. मंडळाचे संदर्भीय परिपत्रक क्र. ०२ अन्वये प्रवेश सत्र २०२१ पासुन Supernumory पध्दत बंद करण्यात आली असुन Supernumory अंतर्गत देण्यात येत असलेल्या अतिरिक्त ५ प्रेवश क्षमता मुळ प्रवेश क्षमतेत समाविष्ट करण्यात आली आहे. सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता २५ वरुन ३० करण्यात आली आहे. सबब, सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट प्रशिक्षण सुविधा, प्रामुख्याने यंत्र सामुग्री व हत्यारे यांची संख्या, त्यापटीत संस्थेत उपलब्ध असणे आवश्यक आहे.

११.१.५. संलग्नित अभ्यासक्रमांसाठी वर्गखोली (Classroom) व कार्यशाळेसाठी (Workshop) आवश्यक बांधिव जागा (Constructed Space) उपलब्धता व त्याबाबत शासकीय यंत्रणेव्दारे साक्षांकीत नकाशा

११.१.६. शिक्षक (Teaching) व शिक्षकेतर (Non-Teaching/ Support Staff) कर्मचारी यांच्या नियुक्ती व पगार संबंधित दस्तऐवज

११.१.७. जागा व इमारत स्वतःच्या मालकीची असल्यास त्यासंबंधी दस्तऐवज.

११.१.८. जागा व इमारत भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेतली असल्यास जागा व इमारत मालक यांसोबत संबंधीत कौशल्य प्रशिक्षण केंद्र यांनी त्यांच्या नोंदणीकृत नावाने व दि.३०.०६.२०२५ पर्यंत वैध असलेला दुय्यम निबंधकाकडे नोंदणी केलेला भाडेकरार (Lease Agreement)

११.१.९. ज्या संस्था इतर नामांकित संस्था व/वा नामांकित औद्योगिक आस्थापना यांच्या कडे उपलब्ध प्रशिक्षण सुविधांचा वापर करीत असल्यास त्या नामांकित संस्था व/वा नामांकित औद्योगिक आस्थापना यांच्या सोबत केलेला व दि.३०.०६.२०२५ पर्यंत वैध सामंजस्य करार (Memorandum of Understanding)

११.१.१०. तथापि, ज्या संस्थांचे भाडेकरार व/वा सामंजस्य कराराची वैधता दि.३०.०६.२०२५ पूर्वीची आहे व त्यांना सद्यस्थिती कोणत्याही कारणास्तव भाडेकरार व/वा सामंजस्य कराराची वैधता दि.३०.०६.२०२५ पर्यंत वाढविणे शक्य नसल्यास अशा संस्थांना भाडेकरार व/वा सामंजस्य करार यापैकी जे दस्तऐवज प्रथत संपुष्टात येईल त्या दिनांका पर्यंत संलग्नता नूतनीकरण देण्यात येईल.

११.१.११. संलग्नता नूतनीकरणासाठी मंडळाच्या खात्यात जमा केलेले नूतनीकरण शुल्क.

११.२. मंडळाने सद्यस्थितीत १ प्रशिक्षण वर्षाकरीता संलग्नता नूतनीकरण शुल्क निर्धारित केले आहे. सबब, ३ प्रशिक्षण वर्षाकरीता संलग्नता नूतनीकरणासाठी एकत्रित ३ वर्षासाठी संलग्नता नूतनीकरण शुल्क मंडळाचे खालील बँक खात्यात जमा करण्यात यावे

| | |
|---|---|
| **Account Holder Name:** | **MSBSVET** |
| **Bank:** | **HDFC BANK LTD** |
| **Branch:** | **KALHER BHIWANDI** |
| **Account Number:** | **501 00 506 165 732** |
| **IFSC:** | **HDFC0006198** |

११.३. मंडळाच्या उपरोक्त नमुद बँक खात्यात केवळ NEFT/ RTGS/ IMPS/ Internet Banking/ Online Payment Gateway च्या माध्यमातुनच संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात यावे. रोख अथवा चेक स्वरुपात संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करण्यात येवू नये व असे जमा केलेले संलग्नता नूतनीकरण शुल्क ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

११.४. संलग्नता नूतनीकरण शुल्क जमा करतांना Transaction Remark मध्ये <संस्था कोड>_Renewal नमुद करावा. उदा. ०२०४४४ हा संस्था कोड असलेल्या संस्थेस संलग्नता नुतनीकरण शुल्क जमा करावयाचे असल्यास Transaction Remark मध्ये “०२०४४४_ Renewal” असे नमुद करावे.

११.५. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची काळजीपूर्वक छाननी करून संस्थेचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात यावे. प्रत्यक्ष निरीक्षणासाठी शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच मंडळांतर्गत मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित अभ्यासक्रमातील तज्ञ निदेशक/ शिक्षक यांचा समावेश असलेली एक समिती नियुक्त करण्यात यावी.

११.६. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्या द्वारे कोणत्याही कारणास्तव संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येण्यापूर्वी संबंधित संस्थेस संलग्नता नूतनीकरणाच्या अर्जातील त्रुटी, दस्तऐवजात मधील त्रुटी, प्रशिक्षण सुविधांमधील त्रुटी, इत्यादी दूर करण्यासाठी व संलग्नता नूतनीकरण शुल्क भरणे यासाठी किमान १५ दिवसांची मुदत देण्यात यावी. तसेच, मुदत देऊन देखील त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या संस्थांची संलग्नता नूतनीकरण नाकारण्यात येणाऱ्या कारणांसहित संबंधित संस्थेस संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांच्याकडून कळविण्यात यावे.

११.७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय यांनी संबंधित प्रादेशिक कार्यालय यांच्यामार्फत मंडळाकडे शिफारशींसह प्रस्ताव दि.२०.०६.२०२२ पूर्वी सादर करावे.

११.८. मंडळाकडे संलग्नता नूतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची समितीमार्फत छाननी करून तीन प्रशिक्षण वर्ष कालावधीसाठी संलग्नता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

११.९. मंडळाकडे दि.२०.०६.२०२२ पर्यंत संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२२ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

११.१०. तथापि, मंडळाकडे दि.२१.०६.२०२२ नंतर संलग्नता नूतनीकरणासाठी शिफारशींसह प्राप्त झालेल्या प्रस्तावांना प्रवेश वर्ष २०२३ मध्ये प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येईल.

११.११. मंडळाचे संदर्भीय परिपत्रक क्र. ०२ अन्वये प्रवेश सत्र २०२१ पासुन Supernumory पध्दत बंद करण्यात आली असुन Supernumory अंतर्गत देण्यात येत असलेल्या अतिरिक्त ५ प्रेवश क्षमता मुळ प्रवेश क्षमतेत समाविष्ट करण्यात आली आहे. सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता २५ वरुन ३० करण्यात आली आहे. सबब, Supernumory अंतर्गत वाढिव प्रवेश क्षमतेसाठी संस्थांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

१२. दि.२०.०५.२०२२ पासुन सुधारित संलग्नता नूतनीकरणासंबंधी कार्यपध्दती लागू करण्यात येत आहे.

(योगेश सुरेश पाटील)
संचालक

प्रत: माहितीसाठी

१. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई ३२
२. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)
३. मंडळाचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या मान्यता प्राप्त व इच्छुक संस्था
४. संगणक विभाग (मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकरिता)
५. निवडनस्ती